# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

केंद्र क्र. १, १३वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२–२२१६ ३९६४/६५ फॅक्स: ०२२–२२१६ ३९७६
ई–मेल : mercindia@merc.gov.in
संकेतस्थळ : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

जाहिरात क्र. ०७/२०१७–१८

## जाहीर सूचना

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१४ मध्ये करावयाच्या प्रस्तावित सुधारणेवर अभिप्राय मागविण्याबाबत**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, त्यांच्या वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण विनियम, २०१४ मध्ये, संपूर्ण राज्यात लघु–दाब जोडण्या मंजूर करण्यासाठी एकसमान भार मर्यादा ठेवण्याकरिता, सुधारणा करण्याचा विचार करीत आहे.

सदर विनियमांमध्ये करावयाच्या प्रस्तावित सुधारणेचे प्रारुप आयोगाच्या **www.merc.gov.in** / **www.mercindia.org.in** या संकेत–स्थळांवर स्पष्टिकरणात्मक ज्ञापनासह उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

आयोग या प्रारुप सुधारणेवर लेखी अभिप्राय, सूचना/हरकती मागवित आहे. त्या ६ (१+५) प्रतींमध्ये सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५ यांना व्यक्तीशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई–मेलने (फॅक्स क्र. ०२२–२२१६३९७६, ई–मेल: **mercindia@merc.gov.in**) या पत्त्यावर पाठवाव्यात.

आयोगास २४ ऑगस्ट, २०१७ पूर्वी प्राप्त होणारे सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती, विनियमांतील या सुधारणेस अंतिम स्वरुप देण्यापूर्वी, आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

**मुंबई**
**दिनांक : २ ऑगस्ट, २०१७**

**सचिव**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**